लेखनकौशल्य कार्यशाळा

युनिसेफ आणि CHARKHA

अनुक्रम

तुम्हाला सिटीझन जर्नॅलिस्ट व्हायचंय?

चौकसपणा वाढविण्याचे काही मार्ग

मुलं, स्त्रिया आणि त्यांचे प्रश्न

१.सिटिझन जर्नॅलिस्ट' म्हणजे काय? - म्हणजे 'नागरिक पत्रकार'. आपण नागरिकांनी आपल्या भोवताली घडणाऱ्या घटनांची माहिती प्रसार माध्यमांद्वारे इतरांना द्यायची. ही नागरिकांची पत्रकारिता आहे. याद्वारे आपण आपल्या वस्तीचा आवाज होऊ शकतो.

२. यासाठी महिलांना प्राधान्य कशासाठी द्यायचं? एक महिला साक्षर झाली की सगळं घर साक्षर होतं असं म्हणतात. महिलांच्या पोटातली ही माया केवळ कुटुंबाच्या नव्हे तर सगळ्या समाजाच्या उपयोगाची ठरू शकते. त्यांच्या नजरेने त्यांनी जग पाहिलं, आणि ते इतरांना सांगितलं, तर आजवर गप्प राहिलेला महिला वर्ग स्वत:बरोबरच सर्वांची उत्क्रांती करू शकेल. आपल्या आजूबाजूच्या ज्या शेकडो स्त्रिया मूकपणाने अन्याय सोसत जगत असतात त्यांनाही या नागरिक महिला पत्रकारांकडून प्रेरणा मिळू शकते. म्हणून या नागरिक पत्रकारितेत आपण प्राधान्याने महिलांना वाव देत आहोत. त्या पुरुषी वृत्तीवर सदैव टीकाच करत राहतील असं नाही. जे चांगलं दिसेल त्याची जाहीर वाहवाही करतील.

३. नागरिक पत्रकार म्हणून काम करताना मुलींनी कोणती काळजी घ्यावी? कोणतीही स्त्री आपल्या जीवनात स्वत:ची जी काळजी घेत असते तीच पत्रकार महिलांनी घ्यायची. पण पत्रकार म्हणून त्या समाजात वावरू लागल्यावर त्यांना थोडंफार नाव मिळतं, सभाधीटपणा येतो, बाहेरचं जग श्रशसलपर्शीशश मशषाशशषझर्शीश शिक्षर्वीशऽशर्षीशाफगपशद्मशद्धशलद्मश? काही प्रश्न आणि त्यांची उत्तरे ३ वेगळं दिसू लागतं. या हरेक नव्या अनुभवात आपण कशी पावलं

टाकावी याचे धडे प्रत्येक व्यक्ती आयुष्यभर घेत असते. पत्रकारही त्याला अपवाद नाहीत.

४. नागरिक पत्रकारांनी बातम्यांसाठी योग्य घटना कशा शोधायच्या? आपल्या सभोवताली उत्सुकतेने पाहत राहिलं, अचानक कधी तरी वेगळं घडतना दिसतं. एखाद्या घरातला इन्व्हर्टर पेट घेतो. किंवा चार शाळकरी मुलं मुंबई-पुण्याला पळून जातात. किंवा बँकेचा वॉचमनच बँकेतले पैसे चोरतो. किंवा सासू आणि सून मिळून भर दुपारच्या उन्हात रस्त्यावरच्या वाटसरूना पिण्याचं पाणी देण्याचं समाजकार्य करतात. किंवा गावातल्या एखाद्या लग्नास अण्णा हजारे येतात. किंवा एखाद्या झाडूवाल्याची मुलगी दहावीच्या परीक्षेत मेरिट लिस्टमध्ये येते. किंवा एखादा राजकीय कार्यकर्ता दारू पिऊन रस्त्यात धिंगाणा करतो. या सगळ्या बातम्याच आहेत. त्या तुम्ही नेटकेपणाने लिहून दिल्यात (किंवा कॅमेऱ्याने टिपल्यात) तर त्या प्रसिद्ध होऊ शकतात.

५. पण या बातम्या लिहायच्या कशा? - सोपं आहे. कागदाला पेन लावायचं आणि लिहायचं! सुरुवातीला ते जड जातं. पण प्रयत्न करत राहिलं की सुधारणा होते. वर्तमानपत्रांत छापून येणाऱ्या बातम्या पाहा. त्या कशा लिहिलेल्या असतात याचं निरीक्षण करा. काही बातम्या जशाच्या तशा लिहून पाहा. त्याने तुमच्या हाताला वळण लागेल. हळूहळू त्यातले बारकावे तुमच्या अंगवळणी पडतील.

६. कोणीही नागरिक बातमीदार होऊ शकतो का? उगाच कोणीही व्यक्ती बातमीदार होऊ शकत नाही. तुम्हाला मुळात वाचनाची आवड असेल, तर पुढे तुम्ही लेखन करू शकता. वाचनामुळे तुमची शब्दसंपत्ती वाढत राहते. मेंदूला सतत चालना मिळते. मजकुराची मांडणी किती वेगवेगळ्या प्रकारे करता येते ते उमगतं. दृष्टी व्यापक होते. भोवतालच्या जगाचा नवनवा अर्थ उलगडत राहतो. आपल्या लेखणीला काव्यमयतेचा, नाट्यपूर्णतेचा, वास्तवाचा अनोखा स्पर्श होऊ शकतो. असे वाचनाचे अनेक फायदे आहेत. बरीच कर्तबगार माणसं आयुष्यभर वाचनाचा व्यासंग करतात. त्यातून त्यांना अवर्णनीय आनंदही लाभतो. चार लोकांना एखादी गोष्ट सांगायला तुम्हाला आवडत असेल, त्यासाठी योग्य शब्द तुम्ही वापरू शकत असाल, एखादी कहाणी यथायोग्य शब्दांत, पण तरीही रसमय आणि नाट्यपूर्ण रितीने सांगणं तुम्हाला जमत असेल, तर आज ना उद्या बातमीदार म्हणून तुम्ही नक्की नाव मिळवाल. पाहा तर खरं प्रयत्न करून.

७. बातमी मिळवण्यासाठी आपण कोणाकडे जाऊ शकतो? सहज बोलता बोलता कोणी तरी काही तरी घडल्याचं सांगून जातो. न्हाव्याचं सलून, सरकारी रुग्णालय, वाण्याचं दुकान, शाळा-कॉलेज, एस. टी. डेपो, सरकारी कचेरी, वाचनालय, अशा ठिकाणी रोज अनेक माणसं येत-जात असतात. लहानमोठ्या आवाजात बऱ्याच माहितीची देवाण-घेवाण करतात. तिथे डोळसपणे वावरत राहिलं की अशा बातम्या हाती लागतात. सुरुवातीला फारसं काही मिळत नाही; किंवा कधी तरी अर्ध्यामुर्ध्या बातमीचा सुगवा लागतो. पण चार-सहा महिन्यांत तुमचा बातमीचा कान आणि डोळा तयार होऊ शकतो. तुम्ही अचूक बातमी हेरता, त्यासाठी आवश्यक ती माहिती मिळवता आणि नेमकेपणाने कागदावर उतरवता. दुसऱ्या दिवशी ती पेपरमध्ये छापून आलेली पाहिली की तुमचा आत्मविश्वास दुणावतो, आणि धीम्या गतीने तुम्ही बातमीच्या क्षेत्रात पुढे जाता. पण तोवर चिकाटीने, हिंमतीने, हुशारीने हे जागल्याचं काम करत राहिलं पहिजे. या क्षेत्रात ज्यांचं नाव होतं त्यांचे कोणते गुण आपण घ्यावे, त्यांच्यापेक्षा सरस काम आपल्या हातून कसं उतरेल, तंत्रज्ञानाच्या नवनवीन सुविधा आत्मसात कशा कराव्या, याचा ध्यास आपल्याला सतत लागला पाहिजे.

८. बातमीसाठी संबंधित व्यक्तींशी संपर्क कसा साधायचा? सरकारी अधिकाऱ्याशी, लोकप्रतिनिधींशी, सार्वजनिक जीवनातील व्यक्तींशी फोनवरून किंवा प्रत्यक्ष भेटून रीतसर माहिती विचारता येते. अर्थात इथेही मानवी स्वभावाचे वेगवेगळे नमुने समोर येतात आणि चित्रविचित्र प्रतिक्रिया स्वीकाराव्या लागतात. आपण शक्यतो नम्रपणे, खालच्या सुरात, पण स्पष्टपणाने बोलावं. आपल्याला जी माहिती मिळवायची असते ती गोड बोलून, पोटात शिरून, माहिती देणाऱ्याचा मूड पाहून हुशारीने मिळवावी. त्याच्यावर वायफळ प्रश्नांचा मारा करून त्याला भंडावून सोडू नये. माहिती दिल्याबद्दल त्याला/तिला धन्यवाद देण्यास विसरू नये. ही माहिती पुरवणारा माणूस कधी अगदी अबोल असतो; त्याला खुबीने बोलतं करावं लागतं. कधी तो भडाभडा बोलत राहतो; त्यातील फापटपसाऱ्याला आवर घालून त्याला मुद्यावर आणावं लागतं. कधी तार सटकलेला माणूस भेटतो; त्याच्या सैरभैर बोलण्याकडे दुर्लक्ष करावं; पण त्या भाकड कचऱ्यातून एखादा सुवर्णकण हाती लागतो का, इकडेही लक्ष ठेवावं.

९. बातमीसाठी माहिती मिळवताना त्यातील खाचाखोचा कशा समजून घ्यायच्या? कोणाकडूनही माहिती घेताना ती सावधपणे स्वीकारावी लागते. ते अर्धसत्य किंवा

असत्य तर सांगत नाहीत नाहीत ना, स्वत:चा मसाला लावून बातमीला वेगळे रंग आणत नाहीत ना, त्यांची माहिती एकांगी किंवा गैरसमजावर आधारलेली नाही ना, याची पारख बातमीदाराला करावी लागते. जरूर तर प्रतिप्रश्न विचारावे लागतात. किंवा विरुद्ध पक्षास भेटून बातमीची दुसरी बाजू समजून घ्यावी लागते. कोणाची नाहक बदनामी होणार नाही याची काळजी घ्यावी लागते. एखाद्या अनिष्ट प्रकरणात स्त्रीचा उल्लेख होणार असेल तर तिचं नाव नमूद न करणं उचित ड्ख रतं. अफवेवर विश्वास ठेवणं कटाक्षाने टाळावं लागतं. नि:पक्षपाती राहावं लागतं. असे बारकावे पत्रकारितेच्या ओघात बातमीदाराच्या अंगवळणी पहत जातात.

१०. बातमीसाठी आवश्यक असणारे पाच ‘क’कार कोणते? कोणी, कधी, कुठे, का, कसे या पाच प्रश्नांचा खुलासा बातमीच्या पहिल्यादुसऱ्या परिच्छेदातच होणं आवश्यक असतं. उदाहरणार्थ, ‘काल जाहीर झालेल्या शालांत परीक्षेच्या निकालात जालना शहरातील सरस्वती विद्यालयाची विद्यार्थिनी कु. शालिनी विनायक बेंडखळे ही ९७.६८ टक्के गुण मिळवून राज्याच्या गुणवत्ता यादीत ७ व्या क्रमांकावर आली. जालना जिल्ह्याने असे ६ नेत्रदीपक यश प्रथमच मिळवले असल्याने, तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.’

११. बातमीचा मागोवा पत्रकाराने कसा घ्यावा? समजा, तुमच्या गावातील ५०–१०० झोपड्यांची वस्ती अचानक एक दिवस आपल्या घरांची आवराआवर करून दुसऱ्या गावी स्थलांतर करताना दिसली. किंवा, एखाद्या रस्त्यावरची अनेक झाडं अचानक तोडली जाताना आढळली. अशी नेहमीपेक्षा वेगळी घटना घडते तेव्हा पेपरसाठी ती बातमी होऊ शकते. त्या ठिकाणी जावं. त्या लोकांशी बोलावं. संबंधित कचेरीकडे किंवा व्यक्तीकडेचौकशी करावी. जरूर तर योग्य कागदपत्रं/पुस्तकं पाहावी. यातून तुमची बातमी उभी राहील.

१२. बातमीसंबंधीची अधिक माहिती मिळवण्यासाठी पत्रकार कोणाकडे जाऊ शकतो? अर्थातच, बातमी संबंधित व्यक्ती आणि कचेऱ्यांकडे. त्यांच्यापैकी लोकप्रतिनिधी आणि कचेऱ्या यांना पत्रकारांशी बोलण्याचा सराव असतो; पण इतर सामान्य माणसं भांबावून जातात. त्यांना पत्रकाराने कुशलतेने बोलतं करावं.

१३. बातमी लिहिताना कोणती पथ्यं पाळावी? आपल्या पेपरच्या वाचकांना आवडेल अशी बातमी हेरावी. ती शक्य तेवढ्या सोप्या शब्दांत लिहावी. वाक्यं छोटी असावीत. कोणाचीही बाजू न घेता वस्तुस्थिती सांगावी. उगाच खळबळजनक

किंवा भडक रितीने लिहू नये. बातमी लिहून झाल्यावर ती वाचून पाहावी. चुकून एखादा शब्द कमी-जास्त पडला असल्यास ती चूक दुरुस्त करावी. जरूर तर बातमीला छायाचित्राची जोड द्यावी. दुसऱ्या दिवशी आपल्या बातमीला वाचक कोणता प्रतिसाद देतात, आपले सहकारी व वरिष्ठ अधिकारी काय प्रतिक्रिया देतात, इतर पेपरमध्ये या घटनेची ७ कशी कशी दखल घेतली आहे, याकडे अवश्य लक्ष द्यावे.

१४. पुण्या-मुंबईच्या प्रमाण भाषेपेक्षा आपल्या गावची स्थानिक भाषा वेगळी असली तर नव्या पत्रकार मुलींनी काय करावं? त्यांनी संकोचून जाऊ नये. आपल्या स्थानिक भाषेची वेगळी नजाकत हे त्यांचं भूषण आहे; दूषण नाही. प्रमाण मराठी भाषेच्या ऐवजी या स्थानिक भाषेत आपली बातमी लिहिल्यास आपल्या भागाच्या बाहेरच्या वाचकांना ती सहजपणे समजणार नाही; म्हणून राज्यस्तरीय पेपरसाठी बातमी शक्य तेवढी प्रमाण भाषेतच लिहावी. पण आपल्या स्थानिक भाषेचा एखादा एखादा खास शब्द इतरांना कळेल अशा बेताने आपल्या बातमीत पेरत राहावं. आणि दिवसेंदिवस अशा शब्दांचं प्रमाण आपल्या लेखनात बेताबेताने वाढवत जावं. गावोगावचे असे जेवढे खास शब्द आपल्या प्रमाण भाषेच्या मुख्य प्रवाहाला येऊन मिळतील तेवढी आपली माय मराठी अधिकाधिक संपन्न होईल. त्याच्या बरोबरीने आपली प्रमाण मराठी भाषा आपल्या अंगवळणी पडावी यासाठी प्रमाण भाषेत अधिकाधिक वाचन-लेखन-संभाषण करत राहावं. पण तुम्ही तुमच्या गावातील स्थानिक पेपरसाठी बातमी लिहीत असाल आणि संपादकांनी तुमच्या स्थानिक भाषेचं स्वागत केलं, तर पूर्ण बातमी स्थानिक भाषेत अवश्य लिहा. तुम्हाला स्वत:ला, संपादकांना आणि परिसरातील वाचकांना त्याचा अनोखा आनंद मिळेल.

१५. न्यूज स्टोरी कशी लिहावी? न्यूज म्हणजे वाचकाला वाचावीशी वाटेल अशा रितीने लिहिलेली नव्या घडामोडीची माहिती. स्टोरी म्हणजे गोष्ट. वर्तमानपत्राचा वाचक प्रत्येक बातमीतील नवी माहिती शोधत असतो आणि त्यात लपलेल्या गोष्टीची त्याला उत्कंठा असते. त्यामुळे वर्तमानपत्रातील जवळजवळ सर्व मजकुरात न्यूजही असते आणि स्टोरीही असते. पण न्यूज स्टोरी ही नेहमीच्या बातमीपेक्षा बरीच मोठी असते. ही विस्तृत हकिगत उत्कंठा वाढवणारी असते, नाट्यपूर्ण असते आणि वास्तव असते; त्यामुळे वाचक त्यात रमतो. अलिकडे दिल्लीत गाजत असलेलं आरुषी- ८ हेमराज हत्याकांड हे न्यूज स्टोरीचं बोलकं उदाहरण आहे.

१६. मुलाखत कशी घ्यावी? या प्रश्नाचं उत्तर देण्याआधी, मुलाखत कोणाची घ्यावी याचा खुलासा केला पाहिजे. एखाद्या व्यक्तीला मोठा पुरस्कार जाहीर झाला असेल, किंवा तिच्या बाबतीत विशेष काही बरं-वाईट घडलं असेल, तर तिच्या तोंडून त्या बाबतीत अधिक तपशील कळावा, अशी सुप्त उत्सुकता समाजात असते. अशा व्यक्तीची मुलाखत प्रसिद्ध झाली तर ती वाचली जाते. परंतु लता मंगेशकर किंवा सचिन तेंडुलकर यांच्यासाख्या जगप्रसिद्ध व्यक्तींची बरीच माहिती समाजाला असते. त्यामुळे त्यांच्या छोट्या-मोठ्या मुलाखती अगदी दुर्मिळ प्रसंगीच घेता येतात. मुलाखतीसाठी आधी प्रश्न तयार ठेवावे. हे प्रश्न छोटे असावेत. मुलाखत देणाऱ्याची उत्तरं रसाळ, मुद्देसूद आणि आटोपशीर असावीत. ती शक्यतो त्यांच्याच शब्दांत द्यावीत. ज्या निमित्ताने मुलाखत घेण्यात आली असेल त्यावर अधिक भर द्यावा. या मुलाखतीतून त्या वक्त्याचं व्यक्तिमत्त्व, त्याची कहाणी, विचार वाचकांपर्यंत नेटकेपणाने पोहोचतील असं पाहावं. मराठीमध्ये सुधीर गाडगीळ अशा मुलाखती रंगवण्यात तरबेज आहेत. काही वर्षांपूर्वी प्रीतीश नंदी या संपादकाने 'इलस्ट्रेटेड वीकली'मधून घेतलेल्या मुलाखती गाजल्या होत्या. जागतिक स्तरावर ओरियाना फलाची या इटालियन महिलेचा मुलाखतकार म्हणून मोठा लौकिक आहे.

१७. सिटिझन जर्नॅलिस्ट होण्यात काही धोके आहेत का? आपापलं जीवन जगताना आणि पोटापाण्याचा उद्योग करताना प्रत्येक व्यक्तीला कधी ना कधी धोका पोहोचू शकतो किंवा तिच्यावर संकटं येऊ शकतात; पत्रकारिताही त्याला अपवाद नाही. पत्रकारितेची म्हणून काही पथ्यं आहेत; ती न पाळता बेबंद पत्रकारिता केल्यास आपण अडचणीत येऊ. पण आपलं काम आपण प्रामाणिकपणे केलं तर त्यातून जे समाधान मिळतं त्यापुढे अचानक उद्भवणारे धोके आणि संकटं अपघातासारखी ठरतात. आपण आयुष्यात कोणताच धोका पत्करायचा नाही असं ठरवलं तर आपलं काम इतकं सुमार होतं की कोणी त्याकडे नजरही टाकत नाही. तेव्हा संकटांना खंबीरपणे हाताळायला हवं.

१८. सिटिझन जर्नॅलिस्ट घेण्याचे फायदे कोणते? तुम्हाला अन्यायाला वाचा फोडायला आवडत असेल, आपल्या लेखनातून समाजाला काही सांगावंसं वाटत असेल, तर या व्यवसायात तुम्ही रमाल. आपल्या व्यक्तिगत आयुष्यात आपण स्वत:साठी सतत काही ना काही करत असतो. पाण आपाण दहा जणांसाठी काम

केलं तर त्याच्या दहापट आनंद मिळतो. शंभर जणांसाठी काम केलं तर शंभरपट आनंद मिळतो. तुमच्या बातम्यांना वाचकांचा जसजसा प्रतिसाद मिळत जाईल तसतसा याचा प्रत्यय तुम्हाला येईल. तुमच्या बातम्या जेवढ्या प्रभावी ङ्ख रतील तेवढे तुम्ही या व्यवसायात सामावले जाल. तुम्हाला नाव मिळेल, तुमच्या आवडीचा पोटापाण्याचा उद्योग मिळेल आणि समाजासाठी काही करत राहिल्याचा अनोखा आनंदही मिळेल.

११ समाजात मुलगी म्हणून आपल्यावर अनेक दडपणं असतात. उदा. आपण सहजपणे आपल्या पाहिजे तिथे जाऊ शकत नाही, कुतूहल म्हणून काही चौकशी करण्यासही अटकाव केला जातो. चारचौघांत वावरायला आपल्याला लाज वाटते. परक्यांसमोर तोंड उघडता येत नाही. अंग चोरून वावरण्याची आपण सवय करून घेतलेली असते. एकंदरीत आपला मोकळेपणा मारला जातो. त्यामुळे मनाची, बुद्धीची आणि शरीराची वाढ खुंटत राहते. या बंधनांचीही आपल्याला सवय होते. ही कोंडी फोडून नागरिक पत्रकार होण्यासाठी चौकसपणा फार उपयोगाचा ठरतो, तसंच तो प्रयत्नपूर्वक अंगी बाणवताही येतो. चौकसपणा वाढवण्यासाठी पुढील मुद्यांचा तुम्हाला निश्चित उपयोग होईल. अधिक माहिती विचारा आपण जसजसे मोठे होतो तसतसं आपल्याला वाटतं की आपल्याला सगळं समजतं आणि आता आणखी काही शिकण्याची जरूर नाही. यामुळे आपली उत्सुकता संपत जाते. मानसिक दृष्ट्या ताजंतवानं राहण्यासाठी आयुष्यभर शिकत राहण्याचं ध्येय डोळ्यांपुढे ठेवायला हवं. जेव्हा शिक्षणाचा प्रश्न येतो तेव्हा ते हावरेपणाने मिळवण्यात काहीच वावगं नाही. शिकण्यात मजा आहे आपल्याला नेहमी वाटतं की शिकणं ही अवघड गोष्ट असते. ते ओझं आहे असं तुम्ही मानलंत तर तुम्ही मनापासून शिकू शकणार नाही. ही मानसिकता  चौकसपणा बदलून ‘शिकणं म्हणजे धमाल आनंद आहे’ असं स्वत:ला पटवलं पाहिजे. निरीक्षण करा आणि पावलं टाका तुमच्या सभोवतालचे लोक आणि जग समजून घेण्यासाठी स्वच:ची सर्व ज्ञानेंद्रिये उपयोगात आणा. एखादा स्पंज जसं अधिकाधिक पाणी शोषून घेतो तसा आपण भोवतालच्या जगातून नाना गोष्टी टिपत राहिलं पाहिजे. नव्या गोष्टींचा स्वीकार करण्याची आपली ही वृत्ती बळकट व्हावी म्हणून आपण प्रश्न विचारत राहिलं पाहिजे. पुढे जा आणि प्रयोग करा आपण एखादी नवी गोष्ट करण्याचा प्रयत्न करत असलो तर त्याच्या विरोधात कोणी ना कोणी थोडीफार कुरकूर करताना आपल्याला दिसतात. पण उत्सुक मंडळींमध्ये आणि आपल्यामध्ये फरक एवढाच असतो की चौकस मंडळी

असे अडथळे सहजपणे ओलांडून अनोळखी प्रदेशात पावलं टाकत राहतात. तेव्हा तुम्हीही आपली चौकस वृत्ती विकसित करत राहा.

मुलांचे अधिकार संयुक्त राष्ट्रसंघाने संमत केलेल्या आणि मुलांच्या अधिकाराच्या सनदेवर भारत सरकारने सही केलेल्या मसुद्याप्रमाणे मुलांच्या हक्काची एकूण ४ प्रकारांत विभागणी करण्यात आलीय. पहिला आहे जगण्याचा अधिकार. दुसरा आहे विकासाचा अधिकार. तिसरा आहे सहभागितेचा अधिकार. चौथा आहे सर्व प्रकारच्या शोषणापासून मुक्ततेचा अधिकार. पहिला महत्त्वाचा आहे तो जगण्याचा अधिकार. गर्भावस्थेत आणि जन्माला आलेल्या प्रत्येक मुलाचा हा मूलभूत हक्क आहे. जन्म झाल्यांनंतर स्वत:चे आस्तत्व असण्याचाही मुलांचा हक्क आहे. म्हणूनच प्रत्येक मुलाला स्वत:चं नाव, पत्ता आणि राष्ट्रीयत्व हवं. प्रत्येक जन्माची नोंद व्हायला हवी. अन्न, वस्त्र आणि निवारा या मुलांना मिळायला हवा. आईवडिलांसोबत राहण्याचा, आरोग्यदायी कुटुंबात राहण्याचा मुलांना अधिकार आहे. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, अन्न सुरक्षा, वैद्यकीय सुविधा आणि महत्त्वाचं म्हणजे आपलं बालपण सुरक्षित वातावरणात घालवण्याचा अधिकार. हे सर्व जगण्याच्या अधिकारांशी संबंधित आहेत. जगण्याचा आणि दुसऱ्याला जगवण्याचा आपला अधिकार आहे. मला नीट जगता येतंय यासाठी इतरांना जगण्यापासून वंचित केलं जात नाहीये ना, याचा विचार आपण करू शकतो. माझ्यासाठी या शहरात तयार होणाऱ्या व्यवस्था या इतरांना विस्थापित करून तयार तर करता आल्या नाहीत ना... माझ्यापर्यंत या आणि अशा अनेक जगण्याच्या कलांना पोहचवताना त्या इतरांच्या ‘कलेवर’ रचल्या नाहीत ना...? आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे, जगण्यात आनंद निर्माण करण्याच्या कृतीत माझा सहभग होतोय ना... या मुलं, स्त्रिया आणि त्यांचे प्रश्न १४ सर्व मुद्यांवर आपण विचार करायला हवा. मुलांचे अधिकार आणि आपण सगळे आज जगभरातून मुलांच्या अधिकारांविषयी जोरदार चर्चा आणि अंमलबजावणी होतेय. खरं तर भारतीय संविधानातच मुलांच्या अधिकाराविषयी मांडणी केली गेलीय. तरी पण इम्पोर्टेड अधिकारांना घेऊन गेल्या १५ वर्षांत आपण जोरजोरात मांडणी करतोय. संयुक्त राष्ट्रसंघाच्या १९८९ च्या अधिवेशनात बालकांच्या अधिकारांविषयी मसुदा संमत केला गेला. २० नोव्हेंबर

रोजी या मसुद्यावर संयुक्त राष्ट्रसंघाने सही केली. आजघडीला तब्बल १९३ राष्ट्रांनी या बाल अधिकारांच्या मसुद्यावर सही केलीय. संयुक्त राष्ट्रसंघाने संमत केल्यानुसार एकूण ५४ अधिकारांविषयी हा मसुदा मांडणी करतो. त्यातील १-४१ निव्वळ मुलांना मिळावयाचे अधिकार आहेत. तर ४२-५४ या कलमामध्ये मुलांना अधिकार मिळवून देण्याविषयी काय व्यवस्था असाव्यात, देशांनी काय करावं, याची मांडणी केली गेलीय. ११ डिसेंबर १९९२ रोजी भारत सरकारनेदेखील या मसुद्यावर सही केलीय आणि म्हणूनच १९९२ नंतर आपण सर्व जण 'बालप्रेमी' तरी झालोय. पण केवळ कागदोपत्री बालप्रेमी न होता खरोखरच आपल्याला बालकांविषयी आस्था असणारी समाजनिर्मिती करायचीय; तर सुरुवात आपल्यापासूनच करावी लागणार आहे.
लैंगिक शोषण जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्याप्रमाणे भारतातील दर १० मुलांमधील एक मुलावर लैंगिक अत्याचार होतो... काही वर्षांपूर्वी मुंबईच्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेच्या अभ्यासानुसार ३ पैकी १ मुलगी आणि १० पैकी १ मुलगा लैंगिक अत्याचारग्रस्त होते. यातील ५० टक्के अत्याचार घरातच घडले होते. म्हणजे कुंपणच शेत खातंय तर... १० वर्षांपूर्वी बेंगलूर येथील 'संवाद' या संस्थेने ३४८ मुलींचा अभ्यास केला. बाल लैंगिक शोषणासंदर्भातील विशेष अभ्यास केलेल्या डॉ. शेखर शेषाद्री या भारतातील पहिल्या डॉक्टरांनी हा अभ्यास केला होता. त्यात त्यांना आढळून आलं होतं की ८३ टक्के मुलींना छेडाछेडीला सामोरं जावं लागतं. त्यातील १३ टक्के मुलींना वयाच्या दहाव्या वर्षाच्या आतच शाब्दिक आणि दृश्य स्वरूपाच्या १५ लैंगिक छळाला सामोरं जावं लागतं. ४७ टक्के मुलींना विनयभंग झालेला आहे. त्यातील १५ टक्के मुली वयाच्या १० वर्षांच्या आत पुरुष नातेवाईकांकडून हस्तमैथुनासाठी वापरल्या गेल्या. १५ टक्के मुलींवर गंभीर स्वरूपाचे अत्याचार झालेले आहेत. त्यातील ३१ टक्के मुली १० वर्षांच्या आतील होत्या. आणि महत्त्वाचं म्हणजे, त्यांना छळणाऱ्या ७५ टक्के व्यक्ती या प्रौढ कुटुंब सदस्य होत्या. बाल हक्कांबाबत काम करणाऱ्या काही संस्थांच्या मते दर १० पैकी ६ मुली आणि ४ मुलं लैंगिक अत्याचाराचे बळी ठरतात. म्हणजेच ६२.५ टक्के मुली आणि ३७.५ टक्के मुलं... बाल लैंगिक शोषण हे अस्वस्थ करणारं, अगदी नकोसं आणि खूपदा आपण कल्पनाही न केलेलं असं दुर्दैवी सत्य आहे. त्या विषयाचा प्रतिसाद हा हे सत्य नाकारण्याऐवजी त्याविषयी जागरूकता वाढवणारा असा असला पाहिजे. हे सर्व कदाचित भयावह वाटेल, पण गोंधळून जाऊ नका... खात्री बाळगा, तुमची सर्व भीती आणि काळजी या योग्य आहेत आणि त्यांना सामोरं जाणं आवश्यक आहे.

कारण या शंका निरसनासाठी जर प्रयत्न झाले नाहीत तर बाल लैंगिक शोषणाला प्रतिबंध आणि उपचार या दिशेने कामच होणार नाही. मुलं आणि भीक एक हमखास उदाहरण बघायला मिळतं ते प्रमुख रेल्वे स्थानकाच्या ब्रीजवर. मुंबई सेंट्रल, दादर, बांद्रा, अंधेरी, मालाड, बोरिवली या स्टेशनांवरील गर्दी पाहता त्या गर्दीत अगदी बेमालूमपणे 'कुणीतरी' मुलांना (खास करून अपंगावस्थेतील मुलांना) दर्शनी भागात भीक मागण्यासाठी ठेवून जातात... या सर्वांवर नजर ठेवणारा कुणीतरी असतोच. मला प्रश्न पडतो तो, या मुलांना धड बसताही येत नसताना कोणीतरी आणल्याशिवाय एवढ्या गर्दीच्या ठिकाणी येणं कसं शक्य होईल? पण आहे... मुलंही आहेत आणि पैसे/भीक देणारे लोकंही आहेत. आणि या मुलांच्या कमाईवर जगणारे लोकंही आहेत. महाराष्ट्र शासनाच्या आकडेवारीसुनार एकट्या मुंबईत जवळजवळ १३,००० भीक मागणारे आहेत. आणि त्यातील ६० टक्के मुलं आहेत. यापैकी प्रत्येक जण हा वेगवेगळ्या माध्यमातून दिवसाला ३०० ते ४०० रुपये कमावतो. म्हणजेच कोट्यवधी रुपयांचा हा व्यापार आहे आणि व्यापारात मोठ्या प्रमाणात मुलांचा १६ वापर होताना दिसतोय. आणि आपण मोठी माणसं 'आपल्या देण्यानं' त्यातून सुटू पाहतोय. देणारे आहेत म्हणून घेणारेही वाढलेत. मूल पळवून नेणं, चोरून आणणं किंवा काम देण्याच्या नावाखाली आणण्याच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ झालीय. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पॉप्युलेशन सायन्स या संस्थेने १७ मुंबईसह देशभरातून जवळजवळ ४०,००० मुलं दरवर्षी हरवली जातात असं संशोधनाअंती सिद्ध केलंय. त्यातील १२,००० मुलांचा शोध कधीच लागत नाही. एकट्या मुंबई शहरात गेल्यावर्षी ३८३६ मुलं बेपत्ता झाली. या सर्व मुलांचा वापर या गुन्हेगारी कृत्यात होत नसेल हे कशावरून? आपल्या देशात या सर्व प्रवृत्तींना ठेचून काढण्याची कायदेशीर तरतूद आहे. मात्र त्याचा वापर होताना दिसत नाही. ज्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही व्हायला हवी. ते मोकाट असतात. कार्यवाही सुरू होते ती पुन्हा बळितांवरच. मुलांची सुरक्षितता 'मुलांची सुरक्षितता' हा प्रश्न सर्वच जणांचा आता जिव्हाळ्याचा प्रश्न बनत चाललाय. मुलांवर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी आणि अशा मुलांची योग्य ती काळजी आणि पुन्हा एकात्मीकरण होण्यासाठी आपल्या भारतात २००० साली 'बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) अधिनियम २०००' तयार केलाय. या केंद्राच्या कायद्यात २००६ साली संशोधनही करण्यात आलंय. त्यानुसार दोन प्रकारच्या मुलांसाठी दोन विशेष व्यवस्था तयार करण्यात आलेल्या आहेत. त्यांपैकी आज आपण काळजी

आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या मुलांसाठी असणाऱ्या व्यवस्थेबद्दल माहिती घेऊ या! काळजी आणि संरक्षणाची गरज असणारं मूल म्हणजे नेमकं काय? या कायद्याच्या कलम २ नुसार... * ज्याचे घर नसेल किंवा घराचे ठिकाण स्थिर नसेल किंवा जगण्यासाठी लागणाऱ्या पूरक गोष्टी नसतील अशी मुलं... मूल अशा व्यक्तीसोबत रहातं जे पालक किंवा इतर व्यक्ती मुलाला जीवे मारण्याची किंवा जखमी करण्याची धमकी देतात आणि शक्यता आहे की ती व्यक्ती ती धमकी अंमलात आणील. अशी व्यक्ती जिने इतर मुलांना मारलंय किंवा छळ केला आहे. किंवा दुर्लक्षित केलंय आणि इतर मुलांसोबत अशाच प्रकारच्या वर्तणुकीची शक्यता आहे... मुलांवर नियंत्रण ठेवण्यास पालक सक्षम नसतील... ज्याचे कुणीही पालक आस्तत्वात नाहीत. कुणी इतर व्यक्ती जबाबदारी घेण्यास तयार नाहीत. पालकांनी त्याला सोडून दिलंय किंवा मूल हरवलेलं आहे किंवा घरातून पाळालंय आणि चौकशीनंतरही पालकांचा शोध लागलेला नाही. ज्या मुलांचा लैंगिक छळ किंवा इतर बेकायदेशीर बाबींबाबत छळ आणि शोषण होतंय. जे मूल नैसर्गिक आपत्तीचे बळी आहे. उदा. त्सुनामी जे मूल मानव निर्मित आपत्तीचे बळी आहे. उदा. धार्मिक दंगली. जे मूल सशस्त्र संघर्षाचे बळी आहे... जे लहान वयात काम करणारं मूल आहे, आणि गंभीर आजारानं त्रस्त असणारं मूल. अशा सर्व मुलांना प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी शासनानं नियुक्त केलेल्या बाल कल्याण समितीसमोर सादर करता येतं. या आणि अशा प्रकारच्या कोणत्याही मुलाचा निर्णय हा बाल कल्याण समितीच्या हातात असतो. या मुलांच्या बाबतीत निर्णय घेताना बाल हक्क संहितेची आणि संविधानाची मार्गदर्शक तत्त्वे ध्यानात ठेवणे महत्त्वाचे असते. बाल कल्याण समितीसमोर कलम ३२ नुसार पोलीस, सामाजिक संस्था, कुणीही नागरिक, लोकसेवक आणि स्वत: ते मूल मुलाला सादर करू शकते. अशा मुलांना बाल कल्याण समिती बाल गृहात दाखल करून घेण्याचे आदेश देते. आणि परिवीक्षा अधिकाऱ्याकडून त्या मुलांची माहिती घेऊन पुढील व्यवस्था करण्याचे आदेश देते. कोणत्या मुलाला काळजी आणि संरक्षणाची गरज आहे, कोणतं मूल कुटुंबातच वाढू शकतं, कोणत्या कुटुंबाना सक्षम करण्याची गरज आहे, कोणत्या मुलांना कुटुंबाभिमुख सेवा पुरवण्याची गरज आहे, कोणत्या मुलांना दत्तक देता येईल, कोणत्या मुलांना संस्थेची गरज आहे, या बाबी लक्षात ठेवून कार्यवाही करण्याची आज्ञा देणे ही बाल कल्याण समितीची भूमिका आहे. मुलांच्या हिताच्या दृष्टिकोनातून अंतिम निर्णयाची जबाबदारी, मुलांचे शोषण १८ आणि अन्याय

करणाऱ्यांच्या विरोधात फौजदारी दखलपात्र गुन्हा दाखल करणं, मुलांच्या निवासी संस्थांमार्फत दर्जात्मक संगोपनाची काळजी घेणं, गरज वाटल्यास मुलांना शोषक वातावरणातून मुक्त करणं, मुलांच्या हिताचं पोषक वातावरण तयार करणं, या बाल कल्याण समितीच्या जबाबदाऱ्या आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, या बालन्याय अधिनियमाच्या कलम २९/५ नुसार या बाल कल्याण समितीला प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याचे अधिकारी आहेत. म्हणजेच न्यायपालिकेच्या भूमिकेत राहून या समितीने मुलांच्या भवितव्याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार आहेत. बाल कल्याण समिती अन्याय करणाऱ्या व्यक्तीच्या/ संस्थेच्या विरोधात खटला नोंदविण्याचे आदेश पोलिसांना देऊ शकतात. एकूणच काय तर बाल कल्याण समिती ही महत्त्वाची व्यवस्था आपल्या जिल्ह्यात आजघडीला उपलब्ध आहे आणि काळजी आणि संरक्षणाबाबतच्या प्रत्येक मुलासाठी ही व्यवस्था महत्त्वाची भूमिका निभावते. यासाठी पोलीस, संस्था, बालगृह या सर्वांची मदत घेतली जाते. मुलांच्या सुरक्षिततेसाठी माहिती असायलाच हवं... आजघडीला बाल न्याय मुलांची काळजी आणि संरक्षण अधिनियम २००० आणि संशोधन २००६ यातील कलम २ (ट) नुसार मूल म्हणजे वयाच्या अठरा वर्षांपेक्षा कमी व्यक्ती असा केलाय. याचा अर्थ मूल म्हणजे १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत त्याचं संरक्षण करण्याची जबाबदारी आपण सर्व मोठ्यांनी पार पाडायला हवी. मुलांचं सर्वप्रथम संरक्षण करण्याची जबाबदारी ही कुटुंबाची. कुटुंबात मूल सुरक्षित रहातंच असं आम्हाला म्हणायचं नाही. तरीसुद्धा सर्वच कुटुंबांत मूल असुरक्षित असतं असं नाही. ज्या कुटुंबात मूल सुरक्षित नाही त्या कुटुंबातून मूल शासकीय व्यवस्थेकडे सुरक्षिततेसाठी सोपवता येते. म्हणजेच कुटुंब सक्षम नसेल तर संरक्षणाची जबाबदारी शासनाची. यासाठी मुलांच्या दृष्टिकोनातून सर्वांगानं मुलांच्या विकासाची भूमिका निभावणाऱ्या शासकीय यंत्रणांची मदत घेता येते. आणि जेव्हा या दोन्ही यंत्रणा संरक्षणासाठी सक्षम नसतील तेव्हा सर्वस्वी जबाबबदारी 'समाजाची'. आणि यासाठीच समाजमनांनी मुलांच्या सुरक्षिततेसाठी भूमिका जास्त संवेदनशीलपणे निभावणं गरजेचं आहे. आपल्या जिल्ह्यात मुलांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी विविध यंत्रणा उपलब्ध आहेत. या यंत्रणा समजून घेऊन या यंत्रणांच्या १९ सहकार्यानं आपल्याला काय उपाय योजता येतील याची माहिती आपल्या प्रत्येकाला होणं आवश्यक आहे. यासाठी आपल्या जिल्ह्यात 'बाल कल्याण समिती' (ज्यामध्ये ५ सदस्यांचा समावेश असतो.) ही समिती जिल्ह्यातील सर्व काळजी

आणि संरक्षणाची गरज असणाऱ्या मुलांबाबत मुलांच्या हिताचे निर्णय घेणारी यंत्रणा आहे. या समितीला प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांचे अधिकार आहेत. या समितीचे आपल्या जिल्ह्यातील सदस्य कोण आहेत, त्यांच्यासमोर जिल्ह्यातील बळित मुलामुलींच्या आणि काळजी-संरक्षणाची गरज असणाऱ्या सर्व मुलांच्या केसेस कलम ३२ (जे. जे. ॲक्ट) नुसार कुणीही घेऊन जाऊ शकतो. या बाल कल्याण समितीने आठवड्यातून किमान ३ वेळा नियोजित वेळेत आणि दिवशी आपली कार्यवाही करणं अपेक्षित आहे. मग शोधा, आपल्या जिल्ह्यात एवढी महत्त्वाची प्रभावी यंत्रणा कार्य करतेय का? करत असल्यास त्यांना सोबत करा आणि करत नसल्यास त्यांना कामाला कसं लावता येईल हे पाहा! यंत्रणा माहिती नाही म्हणून मुलांना असुरक्षित वातावरणात ढकलण्याचा किंवा ठेवण्याचा आपल्याला काहीएक अधिकार नाही. आणि हो... ही यंत्रणा आपल्या जिल्ह्याच्या बालकगृहात/ निरीक्षणगृहात बसत असते हे लक्षात असू द्या! म्हणजे काम करणं सोपं होईल. बाल कल्याण समितीच्या सोबतच आपल्या जिल्ह्यात बाल न्याय मंडळ कार्यरत आहे का ते पाहाच! या बाल न्याय मंडळाकडे गुन्ह्याचं कृत्य केलेल्या विधी संघर्षग्रस्त मुलांना पोलीस उभं करतात. या बाल न्याय मंडळात ३ सदस्य असतात आणि हे तिन्ही सदस्य खंडपीठ म्हणून विधिसंघर्ष ग्रस्त मुलांसाठी निर्णय घेतात. विधिसंघर्ष मुलांना खरं तर कलम १२ नुसार पोलीस, पोलीस ड्ख ाण्यातच जामीन देऊ शकतात. या मुलांना संरक्षित करणं सुद्धा तेवढंच महत्त्वाचं आहे. याच सोबत आपल्या जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बाल मजुरी निर्मूलन कृती दल स्थापण्यात आलेलं आहे का? याची माहिती या. असल्यास या कृतिदलाचे कोण सदस्य आहेत त्यांची नावं जवळ ठेवा, जेणेकरून जिल्ह्यात बालमजुरी निर्मूलनासाठी आपला कृतिशील सहभाग राहील. हे आवश्यक यासाठी की मुलांची पिळवणुकीतून आणि आर्थिक शोषणातून मुक्तता करणं ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या कृतिदलात आपणही सदस्य होऊ शकता हे लक्षात असू द्या! याच सोबत जिल्हाधिकाऱ्यांच्या २० अध्यक्षतेखाली जिल्हा पुनर्वसन समिती कार्यरत आहे. या समितीला कामाला लावण्याची जबाबदारी आपली सर्वांचीच! आपल्या जिल्ह्यात विशेष बाल पोलिस पथक आणि जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात बाल कल्याण अधिकारी यांची नियुक्ती झालेली आहे का, याचीही खातरजमा आपण करून यायला हवी. नियुक्ती झाली असल्यास या यंत्रणांची मदत घेण्यास तयारी, नियुक्ती झाली नसल्यास यासाठी संबंधितांकडे आग्रह, या किमान

गोष्टी आपण मोठ्यांनी करायला हव्यात. या केवळ त्वरित उपलब्ध यंत्रणेविषयी आपण बोलतो आहोत. या यंत्रणांची मदत घेत नक्कीच आपण मुलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देऊ शकतो. नव्हे, ते आपण द्यायलाच हवं... नाहीतर मुलांची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही. तेव्हा आताच माहिती घेत कामाला लागू या! बालविवाह सुमारे दहा कोटी लोकसंख्येच्या महाराष्ट्रातील ग्रामीण भागात बालविवाहांचं प्रमाण फारच मोठंय! त्यातूनच अल्पवयातच मातृत्व लादलं जाणाऱ्या मुलींची संख्या आजही तब्बल २६ टक्के म्हणजे पन्नास लाखाहून जास्त असल्याचे केंद्राच्या पुढाकारानं करण्यात आलेल्या सेल्फ ॲडोलेसन्स ट्रान्झिशन ॲन्ड हेल्थ इनिशिएटिव्ह अर्थात 'साथी' या विशेष अभ्यास पाहणीतून समोर आले आहे. राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी विकासाच्या बाबतीत मागे राहिलेल्या मराठवाड्यातील पाच, विदर्भातील तीन आणि उत्तर महाराष्ट्रातील दोन जिल्ह्यांत ही पाहणी करण्यात आली. तिथले निष्कर्ष वरील भागातील चित्र दाखवणारे असले तरी, बालविवाहाचे एकूण प्रमाण पाहता उर्वरित ग्रामीण महाराष्ट्रातही फार चांगली स्थिती नाही. संपूर्ण भारतात बालविवाहाचं प्रमाण पाहता केवळ ग्रामीण भागातच बालविवाह होतात अशातला मुद्दा नाही. भारतातील प्रमुख शहरांमध्येसुद्धा बालविवाहाचं प्रमाण प्रचंड आहे. राजस्थानात १८ पैकी १ मुलीचा बालविवाह होतो. हेच प्रमाण केरळात १३५ पैकी १ मूल आहे. चेन्नई शहरात हे प्रमाण ४३ पैकी १ आहे. कोलकाता शहर ४७ मुलींपैकी १, तामीळनाडूत हे प्रमाण ६६ मध्ये १ आहे, तर पश्चिम बंगालमध्ये हे प्रमाण ४९ पैकी १ एवढं आहे. नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हे (छऋक्ष्ड) खख ने १९९८-९९ या काळात केलेल्या सर्वेक्षणातून अठरा वर्षांच्या आतील मुला-मुलींच्या लग्नाचं प्रमाण बिहारमध्ये २१ ७१ टक्के आहे. राजस्थानमध्ये ६८.३ टक्के, मध्यप्रदेशामध्ये हेच प्रमाण ६४.७ टक्के आहे. कर्नाटकात ४६.३ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ४५.९ टक्के, हरयाणात ४१.५ टक्के, गुजरात आणि आसाममध्ये ४०.७ टक्के, ओरिसात ३७.६ टक्के, तामिळनाडूमध्ये २४.९ टक्के, जम्मू आणि काश्मिरमध्ये हेच प्रमाण २२ टक्के एवढे आहे. केरळात १७ टक्के तर पंजाबमध्ये ११.६ टक्के आणि हिमालय प्रदेशमध्ये १०.७ टक्के एवढं आहे. या अभ्यासात असंही आढळून आलं की ५१ टक्के लग्न झालेल्या मुली ज्यांचं वय १५ ते १९ दरम्यान आहे त्यांच्या शिक्षणाचं प्रमाण अत्यल्प आहे. हेच प्रमाण अनुसूचित जाती आणि जमातीमध्ये ७३ टक्के आणि ७९ टक्के एवढं आहे. संपूर्ण भारतात मुलींच्या शिक्षणातून गळतीचं प्रमाण ४१.९ टक्के एवढं प्राथमिक शिक्षणात आहे, तर ७१.५१ टक्के एवढं प्रमाण माध्यमिक शिक्षणात आहे. बालविवाहाला विरोध

करण्यासाठी ड्ख ोस पावलं उचलण्याची आज गरज आहे. मुळातच भारत सरकारने १९९२ साली बाल हक्क संहितेला मान्यता दिली असल्यानं, आता तर भारत सरकारला यावर आळा घालणं बंधनकारक आहे. यासाठी भारत सरकारने उहळश्रव चरीीळरसश । झीर्शींशपींळेप अलीं २००७ अंमलात आणलाय. या कायद्यानुसार बालविवाह रोखण्यात भर देण्यात आलाय. मुलाचं वय २१ आणि मुलीचं वय १८ पूर्ण झाल्याशिवाय विवाह करता येणार नाही. तसा प्रयत्न कुणी केल्यास त्या पालकांना ३ महिन्यांपर्यंतची कैद आणि दंड ठोठावण्यात आलाय. कायदा तर करण्यात आलाय, गरज आहे ती प्रभावी अंमलबजावणीची. आजही देशभरात अक्षयतृतीया, आखाजी आणि अन्य अशा मुहूर्तांवर बालविवाह करण्यात येत आहेत. धार्मिक आणि खाजगी बाब म्हणून पोलिस यंत्रणा त्याकडे लक्ष देत नाही. कारण कायद्याच्या दंडात्मक अंमलबजावणीची भूमिका केवळ पोलिसांचीच असल्याने या सर्व प्रकारात त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची ड्ख रणार आहे. मुळातच आपल्याकडे विवाहांना मान्यता घेण्याचं लोकशिक्षण नसल्यामुळे यातून मार्ग काढला जातो आणि ज्यांनी या बालविवाहांना आक्षेप घ्यायला हवेत तेसुद्धा रुढी, परंपरा, मुलींची सुरक्षितता या नावाखाली समर्थन करताना दिसतात. २२ २३ मुलांच्या सुरक्षिततेसाठी नवी वाटचाल प्रत्येक मूल – मग ते आपल्या वस्तीतलं असो, विभागातलं असो, शहरातलं असो, राज्यातलं असो, देशातलं असो वा जगातलं असो... त्याच्या मनात सुरक्षिततेची भावना निर्माण व्हावी यासाठी जागतिक पातळीपासून देश, राज्य, शहर, विभाग आणि वस्ती पातळीपर्यंत विविध यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. पण तरीदेखील मूल सुरक्षित नाही. आपल्या घराच्या चार भिंतींबाहेर असं सुरक्षित जग, आश्वस्त वातावरण मुलांसाठी आजघडीला तरी आपण मोठी माणसं तयार करू शकलेलो नाही. ‘मुंबईतील मुलं हरवण्याचं प्रमाण वाढलंय’ अशा बातम्या सध्या आपण वर्तमानपत्रांत वाचतोय आणि यांतलं एखादं उदाहरण प्रत्यक्ष आपल्या परिसरात अनुभवतोय. इथे मुंबईचा उल्लेख केला असला तरी राज्यातील इतर जिल्हे व देशातील इतर राज्यं यापासून वंचित राहिलेली नाहीत. थोड्याफार फरकाने या घटना ठिकठिकाणी घडत आहेत. गेली कित्येक वर्षे राहत असलेल्या वस्तीतून मुलं अचानक बेपत्ता होत आहेत. अखेरीस ही मुलं जातात कुठे? या मुलांचा व्यापार (चाईल्ड ट्रॅफिकिंग) केला जातो. होय, अगदी ५०० रुपये इतक्या क्षुल्लक किंमतीत आज मुलांना विकलं आणि खरेदी केलं जातंय. यामध्ये केवळ मुलींचीच खरोदी–विक्री होत नाही तर मुलांनाही बालमजुरीच्या कारणासाठी

विकलं जातं, खरेदी केलं जातं. वेठबिगारी करण्यासाठी मुलांची इतर राज्यांमधून ने-आण केली जाते. असाहाय्य असल्याने ही मुलं अत्याचाराविरोधात आवाज उठवणार नाहीत हे मालकांना पक्कं ठाऊक असतं. कामाच्या ठिकाणी मोठ्यांकडून मोठ्या प्रमाणावर या मुलांचा लैंगिक भुकेसाठीही वापर केला जातो. कोकणातून मुलींना घरकामासाठी मुंबईत आणलं जातं. सुरुवातीला उल्लेख केल्यानुसार मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने केंद्र व राज्य सरकारने यंत्रणा उभारल्या आहेत. पण मग आता प्रश्न निर्माण होतो की जर या यंत्रणा कार्यान्वित आहेत तर आत्ताशा मुलांवर होणाऱ्या अन्याय- अत्वाचाराचं प्रमाण किमान कमी व्हायला हवं होतं. परंतु प्रत्यक्षात स्थिती चिंताजनक आहे. आणि म्हणूनच हे चित्र पालटायचं असेल तर मुलांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचार शोषणाविरोधात सर्व समाजघटकांनी एकत्र येण्याची व दबाव गटाच्या रूपात शासकीय यंत्रणांना सक्षम करण्याची गरज आहे. तरच अडचणीत असलेल्या मुलांपर्यंत मदत पोहोचवणं शक्य होईल. 'युनिसेफ' ही संस्था गेली अनेक वर्षे महाराष्ट्रात कार्यरत आहे. 'युनो' या जगप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय संस्थेची ती एक विख्यात शाखा आहे. निरनिराळ्या देशांच्या अविकसित भागांमध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या दृष्टीने ती कार्यरत असते. 'युनिसेफ'च्या पुढाकाराने जालना जिल्ह्यातील मुलींच्या एका गटाची कार्यशाळा औरंगाबाद येथे योजिली आहे. मुंबईतील 'झेवियर इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन्स' (दखउ) ही संस्था प्रसार-माध्यमांच्या प्रशिक्षणाचे कार्य दीर्घकाळ अगत्याने करीत आहे. दखउ च्या द्वारे मराठी पत्रकारितेचे प्रशिक्षण वर्गही चालविले जातात. या दोन्ही संस्थांनी संयुक्तपणे जालना जिल्ह्यातील निवडक मुलींसाठी योजिलेली सदर कार्यशाळा या मुलींना सामाजिक भान देईल, त्यांना लेखन-वाचनाचा अनुभव देईल आणि आपल्या परिसरात त्यांनी नागरिक पत्रकार म्हणून कार्यरत रहावे या दृष्टीने विविध चर्चासत्रांमध्ये सक्रीय संस्कार करील, अशा रितीने या अभिनव उपक्रमाची आखणी